**अपील क्रमांक :- २३७१/२०१९**

**अपिलार्थी :- श्री. सुभाष ज्ञानबा इंगोले,**
**मु. बाळखेड, पो. महागांव, ता. रिसोड, जि. वाशिम.**

**विरुध्द**

**उत्तरार्थी :- १. जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत बाळखेड, ता. रिसोड, जि. वाशिम.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती रिसोड, ता. रिसोड, जि. वाशिम.**

**सुनावणी दिनांक : २४.०८.२०२६ (दिनांक ०७.०४.२०२६ रोजीच्या आदेशाच्या पुढे)**

प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी श्री. सुभाष ज्ञानबा इंगोले उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, महागाव श्री डी. पी. चांदणे, विद्यमान ग्राम पंचायत अधिकारी श्री एस. बी. नागमोडे, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावतीने श्री धवणे, कक्ष अधिकारी उपस्थित आहेत.

**विवेचन**

तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, महागाव श्री डी. पी. चांदणे सांगतात की, त्यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री शेलगावकर यांच्याकडुन दि.०१.०७.२०२२ ला कार्यभार स्विकारला. श्री चांदणे पुढे सांगतात की, त्यांनी दिनांक ०५.०७.२०२२ रोजी पंचायत समिती ला प्रभार यादी सादर केली आहे व त्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगास सादर केला.

आयोगाने पारित केलेल्या दिनांक ०७.०४.२०२६ च्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री गजानन शंकर शेलगावकर यांनी शास्तीबाबत त्यांचा खुलासा आयोगास सादर केलेला नाही. याबाबत आयोग तिव्र नाराजी व्यक्त करते.

विद्यमान ग्राम पंचायत अधिकारी श्री एस. बी. नागमोडे हे दि.०७.०४.२०२६ रोजीच्या सुनावणीस हजर होते, परंतु मागील ४ – ५ महिन्यात त्यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविली नाही.

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावतीने श्री धवणे सांगतात की, श्री शेलगावकर हे अकोला इथे राहतात. तसेच श्री शेलगावकर यांनी त्यांच्या थकित रकमेकरीता सेवापुस्तकसुध्दा घेवुन गेले असे सुध्दा श्री धवने सांगतात.

**अंतरीम आदेश**

१ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विद्यमान ग्राम पंचायत अधिकारी श्री एस. बी. नागमोडे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०७.०९.२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२ तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, महागाव श्री डी. पी. चांदणे यांनी सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात येतो आणि आयोगाने पारित केलेल्या दिनांक ०७.०४.२०२६ च्या आदेशान्वये त्यांची शास्ती कायम करण्यात येते.

३ तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, महागाव श्री डी. पी. चांदणे यांची विभागीय चौकशी का करण्यात येवु नये याबाबत त्यांनी त्यांचा खुलासा आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.

४ आयोगाने पारित केलेल्या दिनांक ०७.०४.२०२६ च्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री गजानन शंकर शेलगावकर यांनी शास्तीबाबत त्यांचा खुलासा आयोगास अद्यापही सादर केलेला नाही. त्यामुळे गट विकास अधिकारी यांना निर्देश देण्यात येतात की, त्यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री गजानन शंकर शेलगावकर यांना नोटीस पाठवुन पुढील सुनावणीच्यावेळी आयोगासमक्ष व्यक्तीशः उपस्थित राहुन शास्तीबाबत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात यावे व तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

५ प्रकरण सुनावणीकरीता दिनांक १५.०९.२०२६ रोजी नेमण्यात यावे.

५.०२.०० वाजता

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

(रविंद्र ठाकरे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २४.०८.२०२६**
जावक क्रमांक दिनांक 0 4 AUG 2026

राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती